# म. गांधींची अहिंसेबद्दलची भूमिका

● डॉ नी. र. वऱ्हाडपांडे

म. गांधी हा चित्रपट बराच गाजला. गांधींच्या जीवनाकला-नंतर जन्मास आलेल्या पिढीला या चित्रपटाने गांधीच्या जीवनकार्याबद्दल जी माहिती दिली ती देण्यास गेली कित्येक वर्षे सुरू असलेला लिखित प्रचार असमर्थ ठरला होता. या चित्रपटामुळे गांधी-बद्दल नवीन पिढीत एक निराळेच कुतूहल निर्माण झाले आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने गांधींच्या जीवनाबद्दल नव्याने चर्चाही सुरू झाल्या आहेत. प्रस्तुत लेखात गांधींच्या अहिंसावादाबद्दल काही विचार प्रकट करीत आहे.

म. गांधींच्या विचाराबद्दल दोन अगदी आत्यंतिक मते मांडण्यात आली आहेत. एक म्हणजे म. गांधी हे मोठे तत्वज्ञ होते, एवढेच नव्हे तर अर्थशास्त्र, समाजशास्त्र व शिक्षण या विषयातही त्यांनी नवीन व मूल्यशाली विचारसरणी प्रस्तुत केली. गौतमबुद्ध आणि महावीर यांच्या-बरोबरच मार्क्स आणि कीन्स, डयूई आणि पियाजे यांच्या पंगतीस बसू शकणारा एकमात्र पुरुष असे या मुल्यमापनाप्रमाणे गांधींचे स्थान ठरते.

दुसऱ्या मुल्यमापनाप्रमाणे गांधी हे मुळी विचारवंत नव्हतेच. ते मुख्यतः राजकारणी पुरुष होते. राजकारणी भूमिकेबरोबरच संताची भूमिका देखिल त्यांनी घेतली होती. संत म्हटला की नैतिक/आध्यात्मिक उपदेश ओघानेच आला. संत एका ठरीव साच्याचा उपदेश करतात. गांधींनीही तसाच उपदेश केला. फरक एवढाच की देशाचे सर्वात प्रभावी राजकीय नेते हे पद त्यांना प्राप्त झाले असल्यामुळे देशासमोर असलेल्या आर्थिक, राजकीय व इतर ऐहिक समस्यावर देखील त्यांना बोलावे लागे. हे बोलणे, ते संताला शोभेल अशा आध्यात्मिक परिभाषेत करीत. पण या विषयाचा आणि अध्यात्माचा सरळ संबंध नाही. तो बळेच जोडल्यामुळे गांधीजींचे जे विचार वेळोवेळी प्रकट झाले ते भोंगळ व सावळागोंधळी प्रलापाचे एक आगर म्हणून उल्लेखिण्यासारखे आहे.

वरील दोन टोकांच्या मूल्यमापनाचा विचार सुरू करण्यासाठी त्यांच्या अहिंसावादाचा येथे विचार करू. कारण त्याबद्दलच त्यांची सर्वात अधिक प्रसिद्धी आहे.

## अहिंसावाद

गांधीजींच्या अहिंसेचे तार्किक विश्लेषण करून तिच्या चिंधडया उडविणे फारच सोपे आहे व हे काम त्यांच्या हयातीतील लोकानी केले देखील आहे. पण असे असून त्यांच्या विचारांची पकड कायम राहते याचे कारण त्यांच्या विचारात, भाषेत माण्डलेल्या स्वरूपात जी संगती दिसते तिच्यापेक्षाही त्यांच्या वृत्तींतून दिसणारी संगति अधिक सखोल आहे. त्यांच्या अहिंसेचेच उदाहरण घेऊन हा मुद्दा विशद करतो.

कुणी आपल्यावर अन्याय करीत असेल तर शारीरिक सामर्थ्य वापरून त्याचा प्रतिकार करू नये, ' प्रतिकार अशा रीतीने करावा की अन्याय करणाऱ्याला आपल्या कृत्याबद्दल पश्चाताप होऊन त्याचे हृदय-परिवर्तन होईल, हे गांधीजींच्या अहिंसा तत्वाचे सार आहे. या तत्वाच्या मर्यादा स्पष्ट आहेत. आपल्या स्वार्थासाठी पाशवी सामर्थ्याचा उपयोग करणाऱ्या सर्व वा बहुतेक व्यक्ति निःशस्त्र प्रतिकाराने पश्चाताप पावण्या इतक्या सुसंस्कृत असतात. माना मुरगाळण्याच्या आधी निशःस्त्र प्रतिकाराने स्वतःचे मन वळविण्याची संधी त्या आपल्या बळीला देतात वगैरे गृहीतकृत्ये खरी नाहीत. शिवाय बलप्रयोगाने हृदयपरिवर्तन होत नाही असे समजणेही बरोबर नाही. ब्रिटिश राज्याने भारताला पुनरूज्जीवन दिले. इंग्रजी भाषेने भारतीयांना विचारशक्ति दिली वगैरे मते रानडे लोकहितवादींपासून तो रमेशचंद्र मुजुमदारां-

तीनचार तास डोळ्यासमोर ( नुसतंच ) पुस्तक धरायचं म्हणजे शिक्षा ! पण यावर्षी इलाज नाही !

आईनं फिल्मफेअर, ' मिल्स अँड बून ' मिळणारी लायब्ररी बंद करून टाकली ( दुष्ट कुठची ! ) आता तर मी मुळीच नाही अभ्यास करणार ! ट्यूशनच्या बाई येवून बोअर करतील– करू देत ! एरवी वह्यातून शेवटच्या पानांवर चित्र काढीत बसायचं. दिवसांमागून दिवस जातील. परीक्षा येईल आणि जाईल. मी म्हणेन– ' पेपर्स ना ? बरे गेले ! आई रिझल्टची वाट बघेल, मग रिझल्ट लागला की माझ्यावर कायमचा शिक्का बसेल –अगदीच टाकाऊ मुलगी– आईला खूप वाईट वाटेल. दुःखानं अगदी बेजार होईल. मग मी म्हणेन ( मनात ) ' असंच पाहिजे हिला. ' नुसत्या कल्पनेनंच मी समाधानानं ओठ मुडपले.

हे समाधान फार काळ टिकलं नाही. परवा शाळेत ' रक्षाबंधन ' समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून कोणी थोर विचारवंत आले होते. त्यांनी भाषणाला सुरवात केली तेव्हा ' बोअर ' म्हणून मी सुरवातीलाच एक भली मोठी जांभई दिली. पण त्यांचा आवाज ऐकून असं वाटलं की जणू खूपशी रूपयाची नाणी खणखणीतपणे वाजत आहेत. त्या नादमय आवाजातले काही शब्द मनावर ठसले.

' मुलांनो, तुम्ही जे काही करता, त्या प्रत्येक कामा मागचा हेतु शुद्ध ठेवा. दुसऱ्याला त्रास देण्याच्या किंवा टिंगल करण्याच्या इराद्याने केलेले कृत्य स्वतःच्याच नाशाला कारणीभूत होते. कोणाला दुःख देणं, कोणावर सूड घेणं, यानं आपल्याला अगदी क्षणिक समाधान मिळतं. पण दुसऱ्याला समाधान मिळवून

मला आपलं रडायलाच येऊ लागलं. काही तरी प्रचंड उलथापालथ माझ्या मनात झाली. आम्ही समुद्रकिनारी गेलो होतो तेव्हा पाण्याची लाट मागे जाऊ लागली की पायाखालची वाळू सरकून पोटात गोळा येई तसं काहीतरी वाटू लागलं. जीव कासावीस झाला. म्हणजे काळी कुरुपही मीच, नुकसानही माझंच होणार शेवटी ! असे विचार इतक्या वर्षात आलेच नव्हते. आता डोक्यात प्रचंड गुंतागुंत होवू लागली त्या गुंतावळ्यात मी पाय अडकून पडते आहे असं वाटू लागलं. पण तरीहि खणखणीत नादमय शब्द दुरून कोठून तरी धीर देत आहेत असं वाटत होतं—' अजून वेळ गेली नाही. '

☆ ☆ ☆

सारख्या आधुनिक इतिहासकारांपर्यन्त प्रतिष्ठित झाली आहेत. ती इंग्रजांना १८५७ चा उठाव समूळ दडपून टाकण्यात व पुढेही त्याच्यासारखा उठाव कधीही होणार नाही इतका निर्णायकपणे बलप्रयोग करण्यात यश आले नसते तर झालीं असती काय याचा विचार करावा. नानासाहेब पेशव्यांना जय होऊन इंग्रजी राज्य नष्ट झाले असते व पेशवाईची पुनःस्थापना झाली असती तर असली मते लोकांनी हसण्यावारी घालवली असती.

## आचार व विचार यातील संगति

केवळ तात्विक आक्षेप बाजूला ठेवले तरी गांधीजींच्या जीवनात देखील त्यांना आपला अहिंसासिध्दान्त अपुरा व असमाधानकारक वाटत होता हे सिध्द करणारी उदाहरणे आहेत. पहिले उदाहरण बोअर युध्दाचे आहे. बोअर युध्दात ब्रिटिशांना मदत करण्यासाठी गांधींनी शुश्रूषापदके उभारली व सैन्यभरतीचा प्रचार केला. पहिल्या महायुध्दात देखील त्यांनी असेच केले. युध्दावर ब्रिटिशांनी सैनिक न पाठविता सत्याग्रही पाठवावे असा आग्रह धरला नाही.

यापेक्षाही अधिक महत्वाचे उदाहण म्हणजे काश्मीरमध्ये भारतीय फौजा पाठवाव्या असा त्यांनी सल्ला दिला. सत्याग्रही पाठवण्याचा सल्ला दिला नाही हे होय. मेहेरचंद महाजन हे त्यावेळी काश्मीरचे दिवाण होते. पठाण टोळीवाले काश्मीरमध्ये लुटालूट व कत्तल करीत आहेत, लवकरच भारतीय सैन्य तेथे न पाठवले तर काश्मीरचा विनाश होईल असे त्यांनी नेहरूना काकुळतीने सांगितले. तेव्हा असे करण्याची घाई नाही असे नेहरू म्हणाले. ते ऐकून मेहेरचंद महाराज उत्तरले ‘तुम्हाला घाई नसेल पण काश्मीरची जनता वाट पाहू शकत नाही. समोरच्याच बंगल्यात जिना राहत. मीं असाच उठून त्यांच्याकडे जातो व पाकिस्तात काश्मीरात सामिल करण्याची त्यांना विनंति करतो.’

असे म्हणून ते उठून गेले तोच शेजारच्या खोलीत हा संवाद ऐकत बसलेले शेख अब्दुल्ला तेथे आले व म्हणाले, ‘असे करू नका, पाकिस्तानच्या घशात काश्मीर घालू नका.’ हे ऐकून नेहरूंनी पटेल यांचा सल्ला घेतला व पटेल व नेहरू दोघेही गांधींना भेटण्यास गेले. गांधींनी त्यावेळी स्वच्छ सांगितले, ‘वाट काय पाहता, भारताची तसूभरही जमीन पाकिस्तानच्या ताब्यात न गेली पाहिजे. ताबडतोब काश्मीरात फौजा पाठवा.’

गांधीजींचे तत्वज्ञान व वर्तन यातील या विसंगतीची उपपत्ती कशी लावायची? गौतमबुद्ध व महावीर यांनी देखील अहिंसेचा उपदेश केला. पण या पन्थाच्या अनुयायी राजांनी युद्धाचा त्याग केला पाहिजे असा त्यांनी आग्रह धरल्याचे नमूद नाही. ख्रिस्ताने देखील कुणी एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करा असा उपदेश केला. पण ख्रिस्ती धर्माचे अनुयायी युद्ध ख्रिस्ताच्या उपदेशाच्या विरूद्ध आहे असे मानीत नाहीत. ख्रिस्ती धर्माच्या आज्ञा काय आहेत हे अधिकारावाणीने सांगणारे चर्च आहे. युद्धबंदी हा ख्रिस्ती धर्माचा भाग आहे असे चर्च मानीत नाही. ख्रिस्ताचा उपदेश वैयक्तिक जीवनासाठी आहे, राज्ये चालविण्यासाठी आवश्यक असलेली हिंसा राज्यकर्त्यांनी करू नये असा त्या उपदेशाचा अर्थ नाही असे ख्रिस्तोपदेशाच्या बाबतीत मानले जाते तसेच गौतमबुद्ध व महावीर यांच्या उपदेशाचेही आहे.

गांधीजींच्या उपदेशाचेही हेच स्वरूप आहे असे म्हणणे कठीण आहे. कारण गौतमबुध्द, महावीर वा ख्रिस्त यापैकी कोणीच राजकारणी नव्हते व त्यांचा उपदेश राजकारणाच्या सन्दर्भात केलला नाही. उलट गांधीजींचा उपदेश राजकारणाच्या सन्दर्भात केला गेला व यातच इतर उपदेशांच्या मानाने त्याची लोकोत्तरता आहे असे मानण्यात येते. ‘अहिंसात्मक प्रतिकार हे केवळ कल्पनेच्या व आदर्शाच्या विश्वातले तत्व नसून राजकारणासारख्या नीतिनिरपेक्ष मानल्या गेलेल्या व्यवहारी क्षेत्रात वापरता येण्यासारखे तत्व आहे हे गांधीजींनी दाखवून दिले.’ या सन्दर्भात गांधीजींनी केलेली गीतामीमांसा देखील लक्षणीय आहे. ग. वि. केतकरांना पाठविलेल्या एक पत्रात ते म्हणतात ‘गीता एका यादवीयुध्दास प्रोत्साहन देण्यास सांगण्यात आली असे मानून मी तिची योग्यता कमी करु इच्छीत नाही.’ यासाठीच गांधीजीनी कौरवपाण्डवां मधील युध्द हे सत्प्रवृत्ती व असत्प्रवृत्ति यामधील युध्दावरील पूरक मानले. गीतेचा उपदेश सत्प्रवृत्तीला असत्प्रवृत्ती विरुध्द लढण्यास उत्तेजन देणारा आहे. एखाद्या भाऊबन्दकीस चिथावणी देणारा नाही, असे त्याचे प्रतिपादन आहे.

## भगतसिंग व पृथ्वीसिंग

आपल्या चळवळीत कुठल्याही प्रकारची हिंसा होऊ नये याची गांधीजी फार काळजी घेत असत. चळवळीतून कोठेही हिंसा उद्‌भवली की ते चळवळ ताबडतोब बन्द करीत. चौरीचौरा येथे दंगा झाल्याबरोबर त्यांनी आपला सत्याग्रह मागे घेतला. भगतसिंगाला फाशी देण्यास आपला विरोध नाही, फक्त ती फाशी काँग्रेसचे अधिवेशन होऊन गेल्यावर देण्यात यावी अशी त्यांनी व्हॉइसरॉयस विनंति केली होती असा आरोप करण्यात येतो व त्याबद्दल सडकून टीका होते. हा आरोप खरा की खोटा हे सांगणे कठिण आहे, कारण गांधीजींवर अनेक कुत्सित आरोप करण्यात आले आहेत. शिवाय हा आरोप खरा की खोटा हे आज ठरविणेही अशक्य आहे. कारण गांधीजींची विनंती तोंडी करण्यात आली होती व ज्यांना करण्यात आली होती त्यांनीं त्याबद्दल काही लिहून ठेवल्याचे ऐकिवात नाही. तेव्हा हा आरोप खरा की खोटा या प्रश्नात येथे शिरत नाही.

पण याबाबतीत एक महत्वाचा मुद्दा असा की आपली चळवळ सर्वस्वी अहिंसात्मक आहे व क्रान्तिकारकांशी आपला काहीही सम्बन्ध

नाही असे इंग्रजांच्या मनावर बिम्बविण्याचा गांधीजींचा सतत प्रयत्न असे. पृथ्वीसिंग या क्रान्तिकारकाला त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा सल्ला दिला. त्यातील उद्देश हाच होता. या प्रयत्नाला अनुसरूनच भगतसिंगाने हत्या केली आहे तेव्हा त्याने त्याचे फळ भोगू नये असा आपण प्रयत्न करणार नाही हे गांधीजी म्हणाले असतील तर ते त्यांच्या धोरणाशी सुसंगतच आहे.

पण याही बाबतीत आणखी एक विसंगति आहे. आष्टी/चिमूरच्या दोषितांना फाशीपासून वाचविण्यासाठी गांधीजींनी जिवाचे रान केले त्यांचे समर्थन करताना त्यांनी खून केलाच नाही असे गांधीजी म्हणाले नाहीत. तरीही त्यांना फाशी देणे हाच एक निर्घृण खून होईल अशी त्यांनी भूमिका घेतली.

आष्टी/चिमूरची हिंसा गांधींजींच्या चळवळीतून उद्भवली होती व म्हणून आष्टी/चिमूरच्या दोषितांना वाचविणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटले असे समर्थन करण्याचीही सोय नाही, कारण 'मला पकडल्यावर जे काही घडले त्याची जबाबदारी माझ्यावर नाही व त्याचा माझ्या चळवळीशी काही सम्बन्ध नाही.' हे त्यांनी व्हाइसरॉयला कळविले होते.

यातून आणखी एक घोटाळ्याचा मुद्दा उद्भवतो. ४२ च्या चळवळीतील हिंसा अनियोजित होती काय ? टपालघरे जाळा, आगगाड्यांचे रूळ उखडा असे सांगणारी पत्रके गांधीजींच्या नावाखाली वाटण्यात येत होती. ती अधिकृत होती असे मानण्यास आधार नाही. पण येती चळवळ हे उघड बंड राहील असे गांधीजी म्हणाल्याचे ते पकडले जाण्यापूर्वीच जाहीर झाले होते, त्याचा त्यांनी इन्कार केला नाही. येती चळवळ एका आठवड्यात सम्पेल असे सरदार पटेल म्हणाले होते. तेव्हा बेचाळिसच्या चळवळीची योजना पूर्वीच्या चळवळीपेक्षा वेगळी होती असे समजण्यास आधार आहे.

ही योजना हिंसेची होती काय ? बेचाळिसच्या चळवळीच्या वेळी जपान्यांनी ब्रह्मदेश काबीज केला होता. ब्रह्मदेश काबीज करताना जपान्यांना फारसे लढावे लागले नव्हते. ब्रह्मी शिपाई एकजात जपान्यांना जाऊन मिळाले. जपान्यांच्या प्रभावाखाली असलेले भारतीय सैनिक इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले नव्हते व सुभाषबोसांच्या नेतृत्वाखाली त्यांनी आझाद हिंद फौज स्थापित केली होती. आझाद हिंद फौजेने भारतात प्रवेश केल्याबरोबर भारतीय सैनिक त्यांना जाऊन मिळतील याबद्दल कोणाला शंका नव्हती. अशा वेळी भारतात 'उघड बंड' झाले तर ब्रिटिश राज्य सहज नाहीसे होईल असे गांधीजी व इतर पुढाऱ्यांना वाटले असेल व म्हणून पूर्वीच्या चळवळीपेक्षा फार निराळ्या तऱ्हेची सर्वस्वी अहिंसेवर कटाक्ष नसलेली चळवळ करण्याचे योजण्यात आले होते असे मानण्यास जागा आहे.

## ४२ च्या चळवळीतील हिंसा

पण या तर्काविरुध्द एक तथ्य असे की आझाद हिंद फौज व सुभाषचंद्र बोस यांच्या हालचालींबद्दल जनतेला माहिती झाली ती ४५ साली, म्हणजे ब्रिटिशांनी निर्णायकपणे युध्द जिंकल्यानंतर त्यापूर्वी कोणत्या कर्तमानपत्रात वा भारतीय नभोवाणीवर त्याबद्दल त्याबद्दल अवाक्षरही नव्हते. काँग्रेस पुढाऱ्यांना इतर माहितीची साधने उपलब्ध असतील व त्यांना हे सारे माहीत असेल तर त्यांनी याची वाच्यता का केली नाही ? सरकारला भिऊन ? जे लोक 'इंग्रजानो भारत सोडा, आम्ही युद्धाला मदत करणार नाही, उलट विरोध करू' असे म्हणत तुरुंगात गेले ते आम्हाला अशी माहिती मिळाली आहे असे जनतेला सांगण्यास कचरत होते असे मानणे कठिण आहे.

पण आझाद हिंद फौजेची माहिती नसली तरी जपानी चाल

करून आल्याबरोबर भारतीय फौज ब्रिटिशांना सोडून जाईल असा ब्रह्मदेशाच्या उदाहरणावरून अंदाज करण्यास जागा होती व या अपेक्षेनेच जपान्यांचा हल्ला होण्याच्या सुमारास ४२ची चळवळ योजण्यात आली होती, असे परिस्थितीजन्य पुराव्यावरून एखाद्याला म्हणावेसे वाटेल.

आपल्या जीवनकालातच झालेल्या या घटनांचे सत्यस्वरूप आज समजणे कठिण होऊन बसले आहे. वस्तुतः ४२ च्या चळवळीचे धुरीण स्वराज्यानन्तरही कित्येक वर्षे हयात होते. पण कोणीही वरील प्रश्नाबद्दल अधिकृत माहिती पुरवली नाही.

तथापि या निबंधाच्या मुख्य मुद्द्याची चर्चा करण्यासाठी वरील प्रश्नांचा निकाल लागलाच पाहिजे असे नाही. बेचाळिसच्या चळवळीची योजना गांधीजींनी आखलेली नसेल व त्यानी आखलेल्या योजनेप्रमाणे ४२ साली चळवळ झालीच नसेल. पण त्यांनी बेचाळिसच्या चळवळीत झालेल्या हिंसेची निंदा केली नाही व इंग्रजांनी त्यांना तसे करण्याची विनंती केली असताही मला सोडल्याशिवाय मी तसे काही करू शकत नाही असे त्यांनी सांगितले. यावरून या हिंसेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण नेहमीपेक्षा वेगळा होता हे पटायला हरकत असू नये.

तात्पर्य हिंसा ही कोणत्याही परिस्थितीत गर्ह्यच असते असे म. गांधी अनेक वेळा म्हणाले असले तरी अनेक महत्वाच्या प्रसंगी त्यांनी हे तत्व न मानता वर्तन केले हे निर्विवाद आहे.

केवळ वर्तनच नव्हे तर नामर्दपणा व हिंसा यात निवड असेल तर मी हिंसाच पसंत करीन या त्यांच्या वचनावरुन तात्त्विक बाबतीत देखील ते अहिंसेचे तत्त्व निरपवाद मानीत नव्हते असे म्हणता येते.

मग म. गांधीनी भारतीय राजकारणात अहिंसेला एवढे महत्व का दिले ?

## सावरकर व टिळक

या प्रश्नाचे उत्तर मिळणे कठिण नाही. भारतीय राजकारणात फक्त गांधीनीच अहिंसेचे महत्व प्रतिपादले असे नसून इतरही अनेक पुढाऱ्यांनी तसेच केले. अहिंसेची चेष्टा करणाऱ्या सावरकरांनी देखील चारदोन लोकांच्या गुप्त मंडळाच्या बनविण्याचा मार्ग टाकून जेव्हा विशाल जनसमूहाला चळवळीत गोवण्याचा प्रयत्न केला तेव्हा अहिंसात्मक प्रतिकाराचाच मार्ग अवलंबिला. हैदराबाद संस्थानाविरुध्द चळवळ करताना त्यांनी पिस्तुलांनी सज्ज असलेले क्रांतिकारक पाठवले नाहीत, सत्याग्रहीच पाठवले. त्यांना सत्याग्रही न म्हणता निःशस्त्र प्रतिकारक म्हटल्याने गांधींच्या व आपल्या विचारातील फरक स्पष्ट होतो असे त्यांनी आपल्या मनाचे समाधान करून घेतले असले तरी एकन्दरीत भारतीय जनतेला ते आत्मवंचनेसारखेच वाटले.

सावरकरांपेक्षाही महत्वाचे उदाहरण लो. टिळकांचे आहे. लो. टिळक क्रांतिकारकांचे पाठीराखे होते, चापेकरांना रॅण्डची हत्या करण्यास त्यांनीच उद्युक्त केले. भारतात उठाव घडवून आणण्यासाठी ते परराष्ट्राशी संधान बांधीत होते वगैरे विधाने नेहमी करण्यात येतात. पण यातले काहीही खरे नाही. लो. टिळक क्रांतिकारकांना उत्तेजन न देता उलट परावृत्त करण्याचाच प्रयत्न करीत हे दाखवून देण्यासाठी नरसोपंत केळकरांनी आपल्या टिळक चरित्रात एका क्रांतिकारकाशी झालेला त्यांचा संवाद सविस्तर दिला आहे. चापेकरांना खून करण्यास उद्युक्त करून ते स्वतः नामानिराळे राहिले असे म्हटल्याने टिळकांचा गौरव होतो असे कुणास वाटत असेल ते असो, पण रॅण्डवधासंबंधी टिळकांना अशी भूमिका देणे ही त्यांची बदनामी होय.

टिळकांनी असे केले की नाही याबाबतीत अर्थात टिळकांची बदनामी कशाने होते हे प्रमाण होऊ शकत नाही. पण असे प्रमाण उपलब्ध आहे, चौकशी करणाऱ्या इंग्रजाच्या गोड बोलण्याला भुलून चापेकरांनी भाबडेपणे सर्व कबूल केले. या कबुलीत आपल्याला असे करण्यास टिळकांनी उद्युक्त केले अशीही कबुली सहज येऊन गेली असती. इंग्रजाच्या मायावीपणाला न भुलता टिळकांच्या भूमिकेबद्दल त्याला थांगपत्ताही लागू न देण्याइतके चापेकर धूर्त असते तर त्यांच्या स्वतःच्या कृत्याबद्दलही निर्णायक पुरावा काढणे इंग्रजांना जड गेले असते.

## टिळक व १८५७

तात्पर्य टिळकांना क्रांतिकारक ठरविल्याशिवाय ते पुरेसे मोठे ठरत नाहीत असे ज्यांना वाटते असे लोक सोडले तर टिळकांच्या चरित्रात ते छिपे क्रांतिकारक होते असे म्हणता येईल असे काहीही नाही. उलट चिरोलने त्यांना राजद्रोही म्हटल्याबद्दल 'मी राजद्रोही नसून राजनिष्ठ आहे' हे सिध्द करण्यासाठी त्यांनी प्रिव्ही कौन्सिलपर्यंत खटला लढविला व लाखो रुपये खर्च केले

टिळकांनी ज्या चळवळी केल्या त्या साऱ्या अहिंसात्मकच होत्या. टिळक व गांधी यात फरक इतकाच की हिंसा ही कोणत्याही परिस्थितीत केलेली असो, पापच आहे असा आत्यंतिक प्रचार त्यांनी केला नाही. गीतेने युध्दाचे समर्थन केले आहे असेच मत त्यांनी मांडले. उलट गांधीच्या उपदेशाचे प्रमुख लक्ष्य परिस्थिति कशीही असो अहिंसा हाच परम धर्म आहे असे प्रतिपादन करणे हेच आहे.

लक्षावधी जनतेवर ज्याचे वजन आहे अशा कोणत्याही भारतीय पुढाऱ्याने हिंसेचा मार्ग उपदेशिला नाही याचे कारणही स्पष्ट आहे. इंग्रजांच्या विरुध्द हिंसा करुन त्यांना हाकलून लावा असा प्रभावी प्रचार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला लक्षावधि लोकावर छाप मारण्याची संधिच इंग्रज देत नसत. असे होण्याच्या आधीच तो फासावर लटकलेला, अंदमानच्या अंधेरीत छळ सोशीत असलेला वा पांदेचरीच्या आश्रमात राजकारण संन्यास घेऊन बसलेला असायचा.

ब्रिटिशांचे राज्य साऱ्या भारतावर स्थापित झाल्यानंतर ब्रिटिश राज्य सशस्त्र लढ्याने उलथून पाडण्याचे फक्त दोन प्रयत्न झाले. एक १८५७ चा व दुसरा आझाद हिंदसेनेचा. यापैकी आझादहिंद फौजेचा प्रवेश इम्फाल या नैऋत्य सीमेवरील स्थानापुढे भारतात होऊ शकला नाही. बाकीच्या भारताला ती नष्ट होईपर्यंत तिची वार्ताही कळली नाही. १८५७ चा उठाव मात्र एक लक्ष चौरस मैल भूमि साधारणपणे एक वर्षभर इंग्रजांच्या ताब्यातून मुक्त करण्यात यशस्वी झाला होता. तेव्हा इंग्रजाविरुध्द सशस्त्र लढा म्हणून फक्त सत्तावनच्या एकमात्र उठावाचाच विचार करणे रास्त आहे.

या लढ्याचा इतिहास सांगतो की ब्रिटिशांच्या नोकरीतील सैन्य जेथे बंड करून उठले तेथेच फक्त ब्रिटिश सत्ता नाहीशी झाली. इंग्रज सैनिक व त्यांना एकनिष्ठ राहणारे शीख गुरखे वगैरे भारतीय यांच्या फौजाशी जेव्हा गाठ पडली तेव्हा क्रांतिकारी फौजांना कुठेच जय मिळाला नाही. रणांगणावर सर्वत्र पराजय झाल्यावर इंग्रजांचे रौद्र स्वरूप असे दिसले की इंग्रजांच्या विरूद्ध सशस्त्र उठाव करण्याची कल्पना ते स्वरूप पाहणाऱ्या वा ऐकणाऱ्या कुणाच्याही मनात कधी येणे शक्य नव्हते. जी जी शहरे बंड करून उठली होती त्यांची इंग्रजांनी तैमूरलंग व नादिरशहा यांना लाजवील अशी कत्तल केली. या शहरांना आगी लावण्यात आल्या व आगीतून जीव वाचवून पळणाऱ्यांना संगिनीने भोसकून पुनः आगीत लोटण्यात आले. या धुमाकुळानंतर घरांच्या ऐवजी बिनछपरांच्या जळक्या भिंती, व आपापले व्यवसाय निर्धास्तपणे करून पोट भरणाऱ्या नागरिकांच्या ऐवजी खाटिकखान्याकडे ओढून नेण्यात येणाऱ्या गुराप्रमाणे भकास दिसणारी हवालदील जनता असे दृश्य सगळीकडे दिसत होते.

## वासुदेव बळवंत व कॉन्व्हेंट संस्कृति

१८५७ नंतर सशस्त्र उठावाचा प्रयत्न वासुदेव बळवंतांनी केला. १८५७ ही शोकान्तिका वाटली तरी एक लक्ष चौरस मैल भूमी परसत्तेपासून एक वर्षासाठी मुक्त करण्यात आली होती. आणि राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे व राजा कुमारसिंग यांच्यासारखे वीर वर्ष–दोन वर्षे इंग्रजाशी दोन हात करून धारातीर्थी पडले या पुढील पिढीला चिरन्तन स्फूर्ति देणाऱ्या घटना त्या उठावात घडल्या. वासुदेव बळवंतांच्या उठावामध्ये असा स्फूर्तिदायक भाग सापडत नाही, असे दुःखाने म्हणावे लागते. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशांनी फक्त आपल्याच देशबांधवांना लुटण्याचे काम केले, इंग्रजांच्या फौजा तर सोडाच, त्यांच्या पोलिसाशी देखील एकही संघर्ष केल्याचे उदाहरण नाही. इंग्रजी खजिन्यावर हल्ला करण्याची वासुदेव बळवंतांनी योजना आखली होती; पण त्यांच्या अनुयायांना सरकारशी संघर्ष मुळी नकोच होता. केवळ नागरिकांची लुटालूट करुन आपली तुम्बडी भरायची होती. त्यांच्यापैकी एकाने फितुर होऊन वासुदेव बळवंतांची योजना सरकारला कळविली. तेव्हा वासुदेव बळवंतांना तो नाद सोडून द्यावा लागला. वासुदेव बळवंत तुरुंग फोडून बाहेर आले या व्यतिरिक्त त्यांच्या उठावात स्फूर्तिदायक घटना नाही.

वासुदेव बळवंतानंतरचे उदाहरण चापेकरांचे आहे. दोघे चापेकर बंधु या प्रकरणात फाशी गेले हा क्रांतिकारी जीवनाला अपरिहार्य भाग म्हणून पत्करला तरी पुढे चापेकरांचा एखादा नातलग जवळ आला की सरकारचा रोष होईल म्हणून जनता त्याला महारोग्यासारखे टाळीत असे यावरुन क्रांतिकारी आंदोलन जनतेत मूळ धरण्याची कितपत शक्यता होती याची कल्पना येण्यासारखी आहे.

तेव्हा टिळक व गांधी या दोघांच्याही वेळची राजकीय परिस्थिती अशी होती की ब्रिटिशांविरुध्द सशस्त्र उठाव करून ब्रिटीशांपेक्षा भारतीय जनतेचेच जास्त नुकसान होण्यासारखे होते.

या परिस्थितीत एक पर्याय भारतीय जनतेसमोर होता व तो म्हणजे ब्रिटिशांनाच या भूमीचे न्याय्य स्वामी मानून त्यांनाच आपली एकनिष्ठा अर्पण करणे. लोकहितवादीच्या विचारसरणीत या पर्यायाला वाव होता, पण त्यात देखील वस्तुतः इंग्रज या देशात परके. आपला समाज हजारो दुर्गुणांनी पोखरल्यामुळे आपण इंग्रजांकडून जिंकलो गेलो, इंग्रजी राज्याबद्दल निष्ठा बाळगणे ही तात्पुरती सोडवणूक आहे, 'पाचशे वर्षांनी' का होईना इंग्रज जातील व आपल्या देशात आपलेच राज्य होईल हेच अन्तिम ध्येय आहे असा सूर होता, त्यामुळे पारतंत्र्याबद्दल असंतोष कितीही सौम्य असला तरी त्याही विचारात कायमच होता.

अशा असंतोषाचे शल्य उपटून काढायचे असेल तर तुर्क/अफगाण व मुघल आक्रमकांच्या बाबतीत भारतीय मुसलमानांनी जो मार्ग अवलम्बिला तो अवलम्बिणे आवश्यक होते. हिंदुधर्माचा त्याग करून जे त्यांचा मुस्लिम धर्म व अरबी, फारसी संस्कृति स्वीकारल्यामुळे आपण हिन्दुसारखे एतद्देशीय नसून तुर्क–मुघलांप्रमाणे बाहेरून आलो अशी बतावणी करण्याचा भारतीय मुसलमानांनी प्रयत्न केला. पण तो दहा टक्क्यापेक्षा जास्त यशस्वी झाला असे म्हणता येत नाही. भारतीय मुसलमान भारतीय हिंदुपेक्षा तुर्क/अफगाण/मुघल आक्रमकांना अधिक जवळचे वाटले तरी ते देखील एतद्देशीय जितांपैकीच आहेत ही त्यांची

भावना कायम होती. अलीकडच्या एका इतिहासाच्या प्राध्यापकाने मुघल राज्यात राजकीय सत्तास्थानाचे वाटप कसे होत असे याचे आकडे दिले आहेत. त्यावरून हे स्पष्ट आहे की योग्य असा अभारतीय मुसलमान न मिळाला तरच भारतीय मुसलमानाला घेण्यात येत असे.

राज्यकर्त्यांशी सरूपता व सायुज्य मिळविण्याच्या भारतीय मुसलमानांच्या प्रयत्नाइतके देखील यश खिस्ती होऊन व कॉन्व्हेण्ट शिक्षण घेऊन, इंग्रजांच्या बाबतीत भारतीयांना येण्यासारखे नव्हते. आपण इंग्रज आहोत अशी बतावणी करण्याचा फार मोठा प्रयत्न अँग्लो इंडियन समाजाने केला, पण इंग्रज त्यांना हिन्दुपेक्षाही अधिक तुच्छतेने लेखील असा अनुभव आला. 'आम्हाला आमचा म्हणण्यासारखा देश व आमची म्हणण्यासारखी संस्कृति नाही' असे अनेक अँग्लोइंडियनांनी मला ब्रिटिश काळात दुःखाने बोलून दाखविले आहे. तसेच अँग्लो-इण्डियनांबद्दल सच्चे इंग्रज अत्यंत तुच्छतेने उद्गार काढीत हे मी स्वतः ऐकले आहे.

इंग्रजांशी रक्ताचा संबंध असलेल्या अँग्लोइंडियनांची ही कथा! तर जे बोलून चालून 'काला आदमी'चे बाटून खिस्ती झाले त्यांच्याबद्दल काय बोलावें? नीग्रो खिस्ती झाला तरी तो नीग्रोच राहतो हा अनुभव जसा नीग्रोंना आला तसाच भारतीय खिश्चनांनाही आपण खिस्ती झालो तरी काला आदमीच राहिलो व मुळात अस्पृश्य असलो तर अस्पृश्यच राहिलो असा अनुभव आला. तेव्हा इंग्रजांशी आत्मीयता साधणे हा मार्ग भारतीयांना बंद होता.

## अजापुत्रं बलिं दद्यात्

जो आपला उघड शत्रू असून आपल्या दुःस्थितीस कारण आहे तो जर अत्यन्त प्रबल असेल व त्याचा द्वेष करणे अत्यन्त आत्मघाताचे ठरत असेल तर मानवी मन या बिकट परिस्थितीवर एक तोड काढते व ती म्हणजे वड्याचे तेल वांग्यावर काढण्याची. अशा वेळी बलवन्ताबद्दलचा सारा द्वेष एखाद्या दुबळ्यावर उगवून घेऊन माणूस समाधान मानत असतो. बलवन्ताबद्दलच्या द्वेषाची आगगाडी साधने बदलून एखाद्या बळीच्या बकऱ्याच्या अंगावरून जाऊ लागते व द्वेषभावना मनात तुम्बून न राहता तिला वाट मिळते. भारतीय जनतेतील एका मोठ्या वर्गाला असा बळीचा बकरा ब्राह्मण व मारवाडी यांच्या रुपाने मिळाला. शेटजी व भटजी हे या वर्गाच्या द्वेषाचे लक्ष्य झाले.

तामिळनाडूत हा बळीचा बकरा ब्राह्मणासकट साऱ्या उत्तरभारतीयांच्या रुपाने मिळाला. या दोन्ही यादवींच्या मुळाशी इंग्रजांची चिथावणी होती. ब्राह्मण हे आपल्या खिस्तीकरणाच्या व ब्रिटिश राज्य चिरस्थायी करण्याच्या मार्गात फार मोठे विघ्न आहे हे मिशनऱ्यांनी ओळखले होते व म्हणून ब्राह्मणाविरुध्द त्यांचा प्रचार, भाषण, लेखन व शिक्षण या तिन्ही साधनाने जोरात सुरू होता. तसेच दक्षिण भारतीय हे भारताचे मूळ रहिवाशी द्रविड आहेत, उत्तरभारतीय हे द्रविडांचा निःपात करुन त्यांना दक्षिणेकडे ढकलणारे परकीय आक्रमक आहेत वगैरे मिशनरीप्रणीत सहेतुक गप्पांच्या आधारावर बसवलेला इतिहास शाळा-कॉलेजातून शिकविला जात होता. हे सर्व खरे असले तरी इंग्रज अत्यंत बलिष्ठ नसते तर भारतातील एका मोठ्या वर्गाच्या मनावर या प्रचाराचा व गप्पांचा फारसा परिणाम होण्याचा संभव नव्हता. इंग्रजांनी स्वतःविरुध्द भारतात असलेल्या स्वाभाविक द्वेषाला आपल्या सामर्थ्याने ठेचून काढले एवढेच नव्हे तर त्याला आपल्या प्रचाराने एक वाट मिळवून दिली.

मूळ इंग्रज द्वेषाचे विस्थापन होऊन भारतीयांच्या एका मोठ्या वर्गाच्या द्वेषाचे लक्ष्य स्वकीय हेच ठरल्यावर इंग्रज हे आमचे जेते त्राते आहेत ही भावना वाढीस लागणे जड गेले नाही. आपणच इंग्रज आहोत अशी बतावणी करण्यापेक्षा आपण इंग्रजांचे कृपापात्र आहोत अशी बतावणी करणे सोपे होते व द्वेषाचा रोख, शेटजी, भटजी व उत्तरभारतीय वगैरेंवर वळल्याने फारसे शेकण्यासारखे नव्हते कारण शेटजी व भटजी यांच्याजवळ संख्येचे वा सत्तेचे बळ नव्हते. साऱ्या उत्तरभारतीयांचा वर्ग इतका असहाय नसला तरी उत्तरद्वेषाची झळ तामिळनाडूतील उत्तरद्वेष्टयाना लागेल असे कोणतेही सामर्थ्य उत्तर भारतीयांना तामिळनाडूत प्रकट करता येण्यासारखे नव्हते.

इंग्रजांशी उघड लढण्याचा मार्ग कल्पनेतही आणण्यासारखा नाही हे ठरल्यावर शेटजी / भटजी / उत्तरभारतीय वगैरे अघातक लक्ष्याकडे एका वर्गाची उत्सुकता वळली. पण यापेक्षाही या उत्सुकतेला एक अधिक मोठी वाट मिळाली. सुमारे दिड शतकांच्या मराठयांच्या पराक्रमामुळे भारतीय मुसलमानात पुनः भारतीय राष्ट्रीयत्वात सामिल होण्याची प्रवृत्ती बळावली होती हे १८५७ मध्ये मुसलमान हिन्दूंच्या खांद्याशी खान्दा मिडवून स्वातंत्र्यसंग्रामात लढले यावरुन स्पष्ट आहे. १८५७ मधील इंग्रजाच्या उग्रवताराने हा मार्ग कायमचा बंद आहे याची जाणीव हिन्दूप्रमाणेच मुसलमानातही झाली व त्याचीही उत्सुकता एखाद्या अघातक लक्ष्याच्या शोधास लागली. त्यांना ते लक्ष्य हिंदूच्या रुपात मिळाले. हिन्दूंनाही १८५७ नंतर मुसलमान हे असे लक्ष आहे असे वाटले.

इंग्रजांच्या सामर्थ्याच्या वाटेस न जाता अधिक अघातक मार्ग शोधणाऱ्या या प्रवृत्तींची परिणती काय झाली हे आता पाहू.

अँग्लोइंडियन व ख्रिश्चन यांनी इंग्रजांशी सरुपता पाठवण्याची जी तोड इंग्रजांच्या बलिष्ठतेच्या बाबतीत काढली ती पाच टक्के देखील यशस्वी झाली नाही. त्या मानाने दुबळ्या स्वकियांचा द्वेष करुन इंग्रजांना त्राते म्हणून स्वीकारण्याची तोड बरीच यशस्वी झाली. असे असले तरी बहुसंख्य भारतीयांना ती मानवत नव्हती. सरकारी नोकऱ्यांच्या शोधात असणाऱ्या ब्राह्मणेतरांना सरकारी नोकऱ्यात मोठ्या संख्येने असणाऱ्या ब्राह्मणाकडे बोट दाखवून हे पहा तुमचे हितशत्रू म्हणून चिथावणे किंवा एखादया मारवाडी सावकाराकडे बोट दाखवून हा पहा तुझे रक्त शोषणारा म्हणून गरीब ब्राह्मणेतर शेतकऱ्याला भडकावणे शक्य होते. पण मारवाडी सावकाराने न लुबाडल्या वा सरकारी नोकरीच्या शोधात नसलेल्या बहुसंख्य जनतेला शेटजी / भटजींच्या द्वेषात स्वारस्य वाटण्यासारखे नव्हते. या बहुसंख्य जनतेला आपले शत्रु म्हणून ज्यांच्याकडे बोट दाखविण्यात येते त्यांच्यात आपले वाकडे करण्याचे काहीच सामर्थ्य नाही, उलट केवळ सामर्थ्यांच्या योगाने इंग्रजांनी देशातली सर्व सत्ता बळकावली आहे हे स्पष्ट दिसत होते.

बहुसंख्य हिंदूची देखील मुसलमानांबद्दल हीच मनःस्थिति होती. मुसलमान ही एक आपल्यातलीच बाटलेली जमात आहे, ती अल्पसंख्य आहे, ती आपले काय वाकडे करणार असेच बहुसंख्य हिंदूना वाटत होते व म्हणून मुसलमान द्वेषाच्या चळवळींना हिंदूमध्ये फारसा साद मिळाला नाही.

इंग्रजांशी लढणे शक्य नाही व त्यांच्यात सामावून जाणे त्याहून अशक्य आहे, आपण भारतीय आहोत व इंग्रज परके आहेत हे विसरुन इंग्रजी राज्य आपले म्हणून स्वीकारणे स्वप्नातही आणता येत नाही, आपल्याच देशातील एखादया अघातक समूहाकडे आपल्या द्वेषाचा ओघ वळवितो हा मार्ग देखील अश्लाघ्य आहे, ब्रिटिशांशी संघर्ष चालू ठेवलाच पाहिजे, पण तो संघर्ष सशस्त्र युध्दासारखा आपल्यावरच शेकणारा नसावा, जो लक्षावधि लोकांना करता येईल असा तो संघर्ष असावा अशा मनःस्थितीत भारतीय जनता असताना टिळक व गांधी यांचे नेतृत्व उदयास आले. जनता टिळक व गांधी यांना डोक्यावर घेऊन नाचली याचे कारण जनतेला जे उत्कटतेने हवे होते तेच त्यांनी तिला दिले हे आहे. टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या रुपाने हजारो लोकांना आचरता येईल असा संघर्षाचा मार्ग दाखवला, गांधींनी त्याला कायदेभंगाची जोड देऊन तो अधिक लढावू केला.

## अहिंसेची आवश्यकता

पण हा लढावू कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर व दिर्घकाळपर्यंत चालू राहायचा असेल तर तो पूर्णपणे अहिंसात्मक असणे आवश्यक होते. हिंसेचा वास आल्याबरोबर इंग्रजांनी त्याची गत वासुदेव बळवंतासारखी करून टाकली असती. अहिंसा हे केवळ धोरण नसून ते एक आध्यात्मीक तत्व आहे. राजकारणात देखील हिंसा करणे पाप आहे, असा आत्यंतिक प्रचार गांधींनी केला नसता तर त्यांची चळवळ अहिंसात्मक राहिली असती की नाही शंका आहे. कुणाकडे बसायला गेले व त्याने खाण्याचा आग्रह केला तर 'मला भूक नाही व या खाण्याने मला काहीही आनंद होणार नाही' असे सांगितले तर आग्रह कधीच बंद होत नाही. भूक नसल्यास खाऊ नये हे भौतिक कारण लोकांना सहज दुर्लक्षिता येण्यासारखे वाटते. उलट 'मला आज सोमवारचा उपास आहे' असे सांगितले तर आग्रह एकदम बन्द होतो. उपासाचे आध्यात्मिक कारण अनुलंघ्य मानले जाते. तसेच अहिंसा हीच प्राप्त परिस्थितीत व्यवहार्य आहे म्हणून हिंसा करू नका असे सांगितल्याने पुष्कळ लोकांनी तिकडे दुर्लक्ष केले असते.

हटल्याने काही लोकांना गांधींचे महत्व एकदम कमी झाल्यार वाटते. 'काय म्हणता गान्धींची अहिंसा ही केवळ एक सोय तुरंग ब्रह्मचर्यासारखा जबरदस्तीचा रामराम होता? मग गांधीत तर राजकारणी पुरूषात फरक काय? गांधींनी राजकारणाचे अध्यारण केले या म्हणण्यात अर्थ काय?'

ते विचारणाऱ्या लोकांची नीतिमत्तेबद्दलची कल्पना मला कधी मजू शकली नाही. एखादे आचरण सोयीचे असल्यामुळेच केव अनीतिमान ठरते काय? सोयीचे आचरण म्हणजे व्यवहारात आता येण्यासारखे व आपल्याला फायदेशीर असणारे आचरण. एर आचरण व्यवहारात आचरता येण्यासारखे व फायदेशीर असले तते तेवढ्यावरून अनीतिमान ठरले काय? हा फायदा काही मक्या व्यक्तिंचाच असेल व बहुसंख्य लोकांचे त्यामुळे नुकसान होण्या- रखे असेल तर ते आचरण अनीतिमान ठरेल, केवळ व्यवहार्य आहे, णून अनीतिमान ठरणार नाही. याच्यापुढे जाऊन असे म्हणता येईल की जे आचरण व्यवहार्य नाही ते नीतिमान असू शकत नाही. कारण नीति ही आचरण्यासाठी म्हणजे व्यवहारासाठीच असते. आमची नीति इतकी उच्च आहे की ती व्यवहारात उतरू शकत नाही असे म्हणणे, आमची नाव इतकी उत्कृष्ट आहे की ती पाण्यावर तरंगू शकत नाही असे म्हणण्यासारखे आहे.

## आंबट द्राक्षे व वास्तव समायोजन

हिंसा करण्याची आपल्यात शक्ति नाही म्हणून अहिंसेचे गोडवे गाणे, हे ज्या द्राक्षापर्यंत हात पोचत नाहीत ती आंबट आहेत असे म्हणण्यासारखे आहे, असा आक्षेप येईल. यासाठी द्राक्षे आंबट या वर्तनाचे थोडे विश्लेषण केले पाहिजे. उंचावर असलेली दाक्षे आंबट आहेत हे नक्की माहित असेल तर ती हाती लागली नसताना त्यांच्या आंबटपणाचा विचार करणे आत्मवंचनेचे ठरणार नाही. द्राक्षे आंबट असुन देखील खाण्यासारखी होती म्हणून ती खाण्याचा प्रयत्न केला, प्रयत्न करतेवेळी द्राक्षांच्या आम्बटपणाचा विचार गौण व त्यांच्या रस- रशीतपणा, टपोरेपण वगैरेचा विचार प्रधान होता. ती हाती न लागल्यावर त्यांच्या आंबटपणाचा विचार प्रधान झाला. असे असले तर बाह्य परिस्थितीशी योग्य समायोजन करण्याचा तो एक प्रयत्न ठरेल. अशा प्रयत्नात काही अनैतिक नाही. प्रत्येक वस्तूत अनेक गुणधर्म असतात. या गुणधर्मांचे परस्परांच्या तुलनेने महत्व काय याची वस्तुनिष्ठ कसोटी काही नाही. तहानल्या माणसाला वाटणारे पाण्याचे महत्व तृप्त माणसाला वाटणारे महत्व सारखे असू शकत नाही. पण या दोघासाठीही पाण्याचे वस्तुनिष्ठ गुणधर्म तेच असतात. तेव्हा कोणत्याही गुणधर्मांचे महत्व आपल्या जीवनात त्याचे स्थान काय आहे यावरुन ठरविणे गैर नाही.

द्राक्षे आम्बट नसलीत तर मात्र ती आंबट आहेत असे म्हणणे ही

वस्वंचना व ती आंबट आहेत असे मानणे ही आत्मवंचना होईल. वंचना अनैतिक आहे याबद्दल दुमत नाही.

आता गांधीजी हिंसेची निन्दा करीत तो गोड द्राक्षांना ती हाती लागत नाहीत म्हणून आंबट म्हणण्याचा वंचनेचा प्रकार होता काय असा प्रश्न उद्भवतो. या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे नाही असे आहे. हिंसा ही हिंसा म्हणून चांगली असे कुणीच म्हणत नाही. कडू औषध व शस्त्रोपचार यासारखा तो आपद्धर्म आहे. हिंसेचे परिणाम नेहमी वाईटच होणार. हिंसेचे वाईट परिणाम, ती हिंसा न केल्याने होणाऱ्या वाईट परिणामापेक्षा अत्यल्प असतील तरच हिंसा धर्म ठरते. तेव्हा हिंसेची निंदा करताना गांधीजी, गोड द्राक्षांना आंबट म्हणण्याचा प्रकार करीत नव्हते, आंबट द्राक्षांनाच आंबट म्हणत होते, फक्त त्या द्राक्षांच्या ठायी आंबटपणावर मात करू शकणारे जे गुणधर्म असण्याचा संभव होता त्याचे महत्त्व शून्य समजत होते.

खऱ्या गुणधर्मांचे महत्त्व नाकारणे ही देखील वंचना आहे असे कुणी म्हणेल. पण महत्त्व हा वस्तुनिष्ठ गुणधर्म नाही. जी हिंसा आम्हाला आचरताच येत नाही, तिच्या चांगल्या गुणधर्मांचे महत्व आमच्या जीवनात शून्य आहे असे मानण्यात आत्मवंचना कोणती? मला दूध पचत नसेल तर दुधाचा पौष्टिकपणा हा गुणधर्म माझ्या जीवनाच्या दृष्टीने महत्त्वशून्य आहे. त्याचप्रमाणे हिंसेचे जे काही चांगले गुणधर्म असतील ते गांधीकाळातल्या भारतीय राजकारणाच्या संदर्भात महत्त्वशून्य होते. तेव्हां गांधीजींच्या अहिंसावादाला द्राक्षे आंबट या प्रकारात घातल्याने तो अनैतिक ठरत नाही; व गांधींच्या अहिंसावादी राजकारणाची महती त्यामुळे कमी होत नाही.

## गांधी आंदोलनाची फलश्रुति

गांधीजींच्या या अहिंसावादी आन्दोलनाची फलश्रुति काय झाली हे आता पाहू. गांधींच्या राजकारणाने स्वराज्य मिळवून दिले हे म्हणणे पूर्णांशाने खरे नाही. ब्रिटिश लोकसभेचे एक सदस्य सॉरेसन यांना मी ऑक्सफर्ड विद्यापीठात शिकत असता तुम्ही भारत सोडून का जात आहात असा प्रश्न विचारला. त्यांनी निःसन्दिग्धपणे सांगितले की भारतीय सैनिक व भारतीय नोकरशाही यांच्यावर विसंबून भारत ताब्यात ठेवता येणार नाही. हे जपानशी झालेल्या युद्धाने स्पष्ट केले आहे. यापुढे भारत ताब्यात ठेवण्यासाठी ब्रिटिश सैन्य व शासनाधिकारी आणावे लागतील. एवढ्या मोठ्या संख्येने ब्रिटिश सैन्य व शासक भारतात पाठविणे आम्हाला आर्थिक दृष्ट्या झेपण्यासारखे नाही. शिवाय एवढा आटापिटा करून भारत ताब्यात ठेवण्यात आमचा फायदा काय? भारतावर राज्य करून आमचा आर्थिक फायदा करून घेण्याचे दिवस केव्हाच गेले.'

याचे तात्पर्य असे की भारतीय सैन्य ब्रिटिशांशी एकनिष्ठ न राहता जपान्यांना मिळाले हे इंग्रजांनी भारत सोडण्याचा निर्णय घेण्याचे तात्कालीक कारण आहे. याहून दिर्घकालीन कारण भारतावर राज्य करणे आर्थिक दृष्ट्या फायद्याचे राहिले नव्हते हे आहे. या आर्थिक कारणांचा विचार या देशाच्या कक्षेबाहेरचा आहे. त्यांचा गांधींच्या चळवळीशी संबन्ध नाही. पण मोठ्या संख्येने भारतीय सैन्य ब्रिटिशाविरुध्द उठले, व सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिन्द फौज रणांगणावर उतरली ही गोष्ट टिळक, गांधी वगैरे नेत्यांनी भारतात लक्षावधि जनतेच्या मनात स्वराज्याचे ध्येय अर्ध शतकाहून अधिक कालपर्यंत जागृत ठेवले नसते तर घडू शकली नसती.

गांधींच्या चळवळीने दुसरे एक महत्कार्य साधले होते. ते अल्पजीवी असले तरी पुढील इतिहासाबद्दल आशा दाखविणारे आहे. ते म्हणजे गांधींच्या चळवळीच्या नौबती झडल्यावर, ब्राह्मणद्वेष, आर्यद्वेष वगैरेंचे पोषण करणाऱ्या चळवळी सूर्यापुढे धुके विरावे तसा विरुन गेल्या. इंग्रजांशी सरुपतर व सायुज्य पावण्याचे प्रयत्न देखील जनतेच्या हेटाळणीचे विषय झाले. गांधीजींची चळवळ सुरू असताना या प्रवृत्ती नष्ट झाल्या असा भास झाला. दुर्दैवाने त्या नष्ट झाल्या नव्हत्या व आज त्यांनी विक्राळ रुप धारण केले आहे. पण गांधीची चळवळ झालीच नसती तर त्यांनी कोणते रुप धारण केले असते याची कल्पना न केलेलीच बरी.

हिन्दुमुस्लीम तेढीच्या बाबतीत गांधीजींना आलेले यश मात्र नगण्य ठरले. गांधीजीचा प्रभाव फक्त सीमाप्रांतात पडला पण तोही लवकरच मुस्लिम लीगपुढे हतप्रभ झाला. याचे कारण हिंदू–मुस्लिम प्रश्न